गाव तिथे प्रतिनिधी नेमणे आहे..

दैनिक यश सिध्दी न्यूजसाठी महाराष्ट्रासह सोलापूर जिल्ह्यात गावत तिथे प्रतिनिधी नेमणे आहे. अधिक माहितीसाठी संपर्क : ९९२१९८८३५८

दैनिक
# यश सिद्धि न्यूज
RNI NO. MAHMAR/2023/84162
YASH SIDDHI NEWS

● वर्ष १ ले ● अंक २९९ वा ● बुधवार २० मार्च २०२४ ● पाने ४ ● किंमत ४ रु/-

| * Volume 1 | Issue 299 | Date : 20/03/2024 blow Wednesday Page 4 Price 4

## अजित पवार गटाला 'घड्याळ' वापरण्यास 'हंगामी' परवानगी



नवी दिल्ली : केवळ विधिमंडळ पक्षाच्या आधारे अजित पवार गट हाच मूळ राष्ट्रवादी काँग्रेस पक्ष असल्याचा निकाल दिल्यावरून सर्वोच्च न्यायालयाने केंद्रीय निवडणूक आयोगावर तिखट शब्दांत ताशेरे ओढले. बंडखोरीला प्रोत्साहन हा दहाव्या अनुसूचीचा अर्थ नव्हता, असे बजावतानाच ही मतदारांची चेष्टा नव्हे काय, असा सवाल खंडपीठाने केला. त्याच वेळी अजित पवार गटाने 'घड्याळ' निवडणूक चिन्ह वापरताना प्रकरण न्यायप्रविष्ट असल्याचे स्पष्ट करणारी जाहिरात द्यावी, असे आदेशही न्यायालयाने दिले.

केंद्रीय निवडणूक आयोगाने अजित पवार गट मूळ पक्ष असल्याचा निकाल देत घड्याळ निवडणूक चिन्ह बहाल केले होते. त्याला शरद पवार गटाने आव्हान दिले असून न्या. सूर्य कांत आणि न्या. के. व्ही. विश्वनाथन यांच्या खंडपीठासमोर मंगळवारी सुनावणी झाली. यावेळी न्यायालयाने निवडणूक आयोगाची कानउघाडणी केली. राजकीय पक्षाच्या संघटनात्मक ताकदीच्या नव्हे तर, केवळ विधिमंडळ पक्षातील बहुमताच्या आधारे मूळ पक्ष कोणाचा हे ठरवत असेल, तर निवडणूक आयोग राजकीय पक्षातील फूट मान्य करत नाही का? दहाव्या अनुसूचीमध्ये राजकीय पक्षातील फुटीला मान्यता देता येत नाही. । पान २ वर

**शरद पवार गटाला दिलासा**

आगामी लोकसभा व विधानसभा निवडणुकांमध्ये 'राष्ट्रवादी काँग्रेस-शरदचंद्र पवार' हे पक्ष नाव व तुतारी वाजविणारा माणूस हे निवडणूक चिन्ह वापरण्यास न्यायालयाने शरद पवार गटाला परवानगी दिली. तसेच हे पक्ष नाव व चिन्ह अन्य कोणताही पक्ष, अपक्ष उमेदवार अथवा अजित पवार गटाला वापरता येणार नाही, याची केंद्रीय व राज्य निवडणूक आयोगाने दक्षता घ्यावी, असेही न्यायालयाने स्पष्ट केले.

## लोकसभेसाठी सोलापूर आणि शिर्डी या जागा मिळाव्यात : आठवले



सांगली : लोकसभा निवडणुकीसाठी महायुतीमधून सोलापूर आणि शिर्डी या दोन जागा मिळाव्यात. दोन जागा निवडून आल्यास रिपब्लिक पार्टी ऑफ इंडियाला मान्यता मिळेल. या जागा मिळण्यासाठी आमचा आग्रह असून यासाठी उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस देखील प्रयत्न करत आहेत. परंतु महायुतीमधून दोन जागा न मिळाल्यास आम्ही पुढील भूमिका स्पष्ट करणार आहोत. भाजपला आता काही नवे मित्र मिळाले आहेत. त्यामुळे भाजपने जुने मित्र विसरू नयेत, असे रामदास आठवले म्हणाले. ते म्हणाले की, जनतेचा पाठिंबा कसा मिळवायचा हे राहुल गांधी यांच्यापेक्षा नरेंद्र मोदी यांना जास्त माहिती आहे. सोनिया गांधी यांनी राहुल गांधी यांना यापूर्वीच पंतप्रधान बनवायला हवे होते. आता लवकर काँग्रेसला सत्ता मिळेल, असे वाटत नाही. त्यामुळे राहुल गांधी पंतप्रधान होतील असे वाटत नाही. मुंबईत भारत जोडो यात्रेचा समारोप झाला. परंतु काँग्रेसचा खरा समारोप चार जून रोजी होणार आहे. उत्तर प्रदेशमध्ये काँग्रेसची एकही जागा निवडून येईल, असे वाटत नाही. तसेच जोपर्यंत जनतेचा पाठिंबा आहे तोपर्यंत महायुती सत्तेत राहील, असेही ते म्हणाले.

## गडचिरोलीत ४ नक्षलवाद्यांना कंठस्नान

गडचिरोली : लोकसभा निवडणुकांच्या पार्श्वभूमीवर घातपात घडविण्यासाठी तेलंगणाहून गडचिरोलीत दाखल झालेल्या ४ नक्षलवाद्यांना कंठस्नान घालण्यात गडचिरोली पोलिसांना यश आले आहे. मंगळवारी पहाटे अहेरी तालुक्यातील कोलामार्का जंगल परिसरात ही चकमक उडाली. यात तेलंगणातील मंगी इंद्रावेल्ली आणि कुमराम भीम येथील नक्षल्यांच्या विभागीय सचिव सदस्य वर्गिश, सिरपूर-चेन्नूर क्षेत्र समितीचे सचिव मगटू, सदस्य कुरसंग राजू, कुडीमेट्टा व्यंकटेश हे चार नक्षलवादी ठार झाले. चौघांवर एकूण ३६ लाखांचे बक्षीस होते. पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, १८ मार्च रोजी रात्रीच्या सुमारास तेलंगणातील नक्षल्यांच्या समितीचे काही सदस्यांनी प्राणहिता नदी ओलांडून अहेरी तालुक्यात प्रवेश केला होता. गडचिरोली पोलिसांना कुणकुण लागताच पोलीस अधीक्षक नीलोत्पल यांनी नक्षलविरोधी अभियान प्रमुख अतिरिक्त पोलीस अधीक्षक यतीश देशमुख यांच्या नेतृत्वात अहेरी प्राणहिता पोलीस मुख्यालयातील विशेष नक्षलविरोधी पथक सी.६० च्या जवानांना कोलामार्का जंगलातील छत्तीसगड सीमेलगत असलेल्या टेकडी परिसरात अभियान राबविण्याची सूचना केली. चकमक थांबल्यानंतर परिसराची झडती घेतली असता चार नक्षलवाद्यांचे मृतदेह सापडले आहेत. गोळीबाराच्या ठिकाणाहून १ एके ४७, १ कार्बाइन आणि २ देशी बनावटीचे पिस्तूल, नक्षलवादी साहित्य जप्त करण्यात आले.

## सीएएला स्थगिती देण्यास सर्वोच्च न्यायालयाचा नकार




नवी दिल्ली : संसदेने मंजुरी दिल्यानंतर तब्बल पाच वर्षांनी वादग्रस्त नागरिकत्व दुरुस्ती कायदा (सीएए) केंद्र सरकारने गेल्या सोमवारी (११ मार्च) लागू केला. त्यासंदर्भातील अधिसूचनादेखील काढण्यात आली आहे. सरकारने राजकीय फायद्यासाठी लोकसभा निवडणुकीच्या महिनाभर आधी हा निर्णय घेतल्याची टीका होत आहे. तसेच या कायद्याला विरोध करणाऱ्या याचिकादेखील सर्वोच्च न्यायालयात दाखल करण्यात आल्या आहेत. अशा २३७ याचिकांवर सर्वोच्च न्यायालयात आज (१९ मार्च) सुनावणी घेण्यात आली. सरन्यायाधीश धनंजय चंद्रचूड यांच्या अध्यक्षतेखालील तीन सदस्यीय खंडपीठाने या याचिकांवर सुनावणी घेतली. दरम्यान, आजच्या सुनावणीवेळी न्यायमूर्तींनी सीएएवर कोणत्याही प्रकारची स्थगिती देण्यास नकार दिला. तसेच न्यायालयाने केंद्र सरकारला पुढील तीन आठवड्यांच्या आत उत्तर देण्याचे आदेश दिले आहेत. या कायद्याला विरोध करणाऱ्या याचिकांमध्ये मांडलेल्या मुद्द्यांवर आणि प्रश्नांवर केंद्र सरकारला उत्तर देण्यास सांगितलं आहे.

सुनावणीवेळी सरन्यायाधीश चंद्रचूड यांनी केंद्र सरकारच्या प्रतिनिधींना प्रश्न विचारला की, अधिसूचनेवर स्थगिती देण्याची मागणी करणाऱ्या याचिकेवर उत्तर देण्यासाठी तुम्हाला किती वेळ लागेल? यावेळी केंद्र सरकारच्या वतीने न्यायालयात हजर असलेले महाधिवक्ते म्हणाले, आम्हाला किमान चार आठवडे लागतील. त्यावर न्यायालयाने केंद्र सरकारला तीन आठवड्यांची मुदत दिली. तसेच या प्रकरणाची पुढील सुनावणी ९ एप्रिल रोजी होईल, असं सांगितलं.

याचिकाकर्त्यांपैकी एकाचे वकील कपिल सिब्बल यांनी केंद्र सरकारला तीन आठवड्यांची मुदत देण्याच्या निर्णयाचा । पान २ वर

## अवकाळी पावसानं झोडपलं! विदर्भ मराठवाड्यात गारपीट; गहू, मका, मिर्चीसह भात पिकाचं मोठं नुकसान

मुंबई : राज्यात अवकाळी पावसाने हजेरी लावली आहे. हवामान विभागाने विदर्भ आणि मराठवाड्यात पावसाची शक्यता वर्तवली होती. हवामान विभागाच्या अंदाजानुसार, राज्यासह देशात पुढील दोन दिवस पावसाची शक्यता कायम आहे. राज्यात गेल्या दोन दिवसांपासून अवकाळीची पावसाची हजेरी पाहायला मिळत आहे. पुढील ४८ तासांत पावसाची शक्यता कायम असल्याचं हवामान विभागाने म्हटलं आहे.

भंडाऱ्याच्या साकोली तालुक्यात वादळी वाऱ्यासह गारपीट होऊन पिकांचं मोठ्या प्रमाणात नुकसान झालं आहे. मंगळवारी सायंकाळच्या सुमारास भंडारा जिल्ह्याला अवकाळी पावसानं झोडपून काढलं. साकोली तालुक्यात वादळी वारा आणि गारपिटीसह मुसळधार अवकाळी पावसानं हजेरी लावली. या अवकाळी पावसामुळे शेतातील मका, गहू, भात पीक यासह बागायती शेती आणि पालेभाज्यांच्या शेतीचं मोठ्या प्रमाणात नुकसान झालं आहे. मागील तीन दिवसांपासून भंडारा जिल्ह्यात कुठे हलक्या, तर कुठे मध्यम स्वरूपाच्या पावसानं हजेरी लावलेली असतानाच आज गारपीट झाल्यानं शेतकऱ्यांची चिंता वाढली आहे.

गोंदिया जिल्ह्यात वादळी वाऱ्यासह गारांचा पाऊस पाहायला मिळत आहे. हवामान विभागाने ऑरेंज अलर्ट दिला होता, त्यामुळे गोंदिया जिल्ह्यात पावसाची हजेरी पाहायला मिळत आहे. हवामान विभागाने विदर्भात तीन दिवस वादळी वाऱ्यासह अवकाळी पावसाची शक्यता वर्तविली होती. हा अंदाज खरा ठरत असून मंगळवारी दुपारपासून गोंदिया जिल्ह्यात वादळी । पान २ वर

## लोकसभा सार्वत्रिक निवडणूक २०२४ नमुना मतपत्रिका छपाईस निर्बंध

सोलापूर/प्रतिनिधी: भारत निवडणूक आयोगाने १६ मार्च रोजी सार्वत्रिक लोकसभा निवडणूकीचा कार्यक्रम घोषित केला आहे. त्याच दिवसापासून आदर्श आचारसंहिता अंमलात आल्याने जिल्ह्यातील लोकसभा सार्वत्रिक निवडणूकीची संपूर्ण प्रक्रिया शांततेत, निर्भय व न्याय वातावरणात पार पाडण्याच्या दृष्टिकोनातून राजकीय पक्षांनी, निवडणूक लढविणाऱ्या उमेदवारांनी किंवा त्यांच्या प्रतिनिधींने अथवा त्यांच्या हितचिंतकाने मुद्रणालयाच्या मालकाने व इतर सर्व माध्यमांद्वारे छपाई करणाऱ्या मालकाने तसेच प्रकाशकाने नमुना मतपत्रिका छापताना इतर उमेदवाराचे नाव व त्यांना नेमून देण्यात आलेले चिन्ह वापरणे, नमुना मतपत्रिकेसाठी आयोगाने निश्चित केल्याप्रमाणे कागद वापरणे, । पान २ वर

## रहदारीस अडथळा होईल असे निवडणूक साहित्य लावण्यास निर्बंध

सोलापूर/प्रतिनिधी : लोकसभा सार्वत्रिक निवडणूक २०२४ चा कार्यक्रम १६ मार्च २०२४ रोजी घोषित झाला असुन, आदर्श आचारसंहिता अंमलात आली आहे. जिल्ह्यातील लोकसभा निवडणूकीची संपूर्ण प्रक्रिया शांततेत, निर्भय व न्याय वातावरणात पार पाडण्याच्या दृष्टीकोनातुन राजकीय पक्षांनी, निवडणूक लढविणाऱ्या उमेदवारांनी किंवा त्यांच्या प्रतिनिधींनी अथवा त्यांच्या हितचिंतकाने निवडणूक संबंधी साहित्य रहदारीस अडथळा निर्माण होवु शकेल किंवा अपघात होण्याची शक्यता नाकारता येत नसल्यामुळे मुंबई पोलीस अधिनियम १९५१ चे कलम ३३(१) (डीबी) अन्वये जिल्हाधिकारी तथा जिल्हा दंडाधिकारी कुमार आशीर्वाद यांनी निर्बंध आदेश जारी केले आहेत. जिल्ह्यातील लोकसभा निवडणूकीची संपूर्ण प्रक्रिया शांततेत, निर्भय व न्याय वातावरणात पार पाडण्याच्या दृष्टीकोनातुन राजकीय पक्षांनी, निवडणूक लढविणाऱ्या उमेदवारांनी किंवा त्यांच्या प्रतिनिधींनी अथवा त्यांच्या हितचिंतकाने सार्वजनिक इमारतीच्या ठिकाणी, सार्वजनिक रस्त्यावर, निवडणूकी संबंधी पोस्टर्स, बॅनर्स, पॉम्प्लेट्स, कटआऊट्स, होर्डीग्ज, कमानी लावणे या व इतर बाबीमुळे रहदारीस अडथळा निर्माण होवु शकेल किंवा अपघात होण्याची शक्यता नाकारता येत नसल्यामुळे अशा पध्दतीने लावण्यास निवडणूक प्रक्रिया पूर्ण होईपर्यंत (दिनांक ६ जून २०२४ पर्यंत) निर्बंध राहिल.

## निवडणूक प्रक्रिया निर्भय वातावरणात होण्याच्या दृष्टीने यंत्रणांनी सतर्क रहावे : मुख्य निवडणूक अधिकारी एस.चोक्कलिंगम



मुंबई : केंद्रीय निवडणूक आयोगाच्यावतीने लोकसभा निवडणूक कार्यक्रम जाहीर करण्यात आला असून संपूर्ण निवडणूक प्रक्रिया पारदर्शक, निर्भय आणि मुक्त वातावरणात पार पाडण्याच्या दृष्टीने आयोगाने निर्देशित केले आहे. आयोगाच्या नियमावलीचे काटेकोर पालन सर्व संबंधितांकडून केले जाईल, कुठल्याही प्रकारे पैसे तसेच बळाचा दुरुपयोग निवडणूक प्रक्रियेत होणार नाही, यासाठी सर्व संबंधित यंत्रणांनी सतर्क राहण्याच्या सूचना मुख्य निवडणूक अधिकारी तथा प्रधान सचिव एस. चोक्कलिंगम यांनी येथे दिल्या.

मंत्रालयात ईएसएमएस प (एडव्ह -र्फि/झ्रिीश्र) संदर्भात आयोजित बैठकीत श्री. चोक्कलिंगम यांनी संबंधितांना निर्देशित केले. यावेळी अतिरिक्त मुख्य निवडणूक अधिकारी तथा सहसचिव डॉ. किरण कुलकर्णी यांच्यासह सर्व संबंधित यंत्रणांचे वरिष्ठ अधिकारी उपस्थित होते.

चोक्कलिंगम म्हणाले की, लोकशाहीच्या तत्वांचे पालन करत पारदर्शक, निर्भय वातावरणात संपूर्ण निवडणूक प्रक्रिया यशस्वीरित्या पार पाडण्याची जबाबदारी प्रत्येक यंत्रणेची असून या व्यापक जाणीवेतून सर्वांनी सतर्कतेने आणि प्रभावीरित्या कार्यप्रणालीचे व्यवस्थापन ठेवावे. केंद्रीय निवडणूक आयोगाने दिलेल्या अधिकाराचा तसेच आपल्या यंत्रणांकडे असलेल्या अधिकारांचा योग्य वापर करुन प्रभावीपणे निवडणूक प्रक्रियेत करण्यात येणारा पैसा, बळाचा संभाव्य दुरूपयोग रोखावा. अशा प्रकारचे बेकायदेशीर कृत्य करणाऱ्या दोषींवर कारवाई करावी, या संदर्भात नियमितपणे निवडणूक आयोगाला, मुख्य निवडणूक अधिकारी कार्यालयास अहवाल द्यावा. यासंदर्भातील सर्व कार्यवाही तत्परतेने करावी. या सर्व प्रक्रियेत विविध यंत्रणा संबंधित असून सर्व यंत्रणांनी परस्पर समन्वयाने अपप्रकार रोखण्यासाठी यशस्वी नियंत्रण ठेवावे. राज्यभरात सर्व ठिकाणी पुरेशा प्रमाणात तपासणी पथक, तपासणी नाके उपलब्ध राहतील, याची यंत्रणांनी खबरदारी घ्यावी. राज्यातील सर्व विमानतळे, रेल्वे स्थानके, बंदरे, सागरी किनारे या ठिकाणी बारकाईने लक्ष ठेवावे, संशयास्पद बाबी आढळताच कसून तपासणी करावी. वन विभागानेही चेकपोस्ट ठेवावेत. तटरक्षक दल, पोलिस, कस्टम या तिन्ही यंत्रणांनी समुद्र मार्गे कुठल्याही प्रकारची बेकायदेशीर आवक-जावक, वाहतूक, । पान २ वर

## लाजिरवाणा विक्रम: सर्वाधिक प्रदूषित देशांमध्ये भारत जगात तिसऱ्या स्थानावर

नवी दिल्ली : जागतिक महासत्ता होण्याच्या दिशेनं वाटचाल करणाऱ्या भारताच्या नावावर एक लाजिरवाणा विक्रम झाल्याचं नुकतंच एका सर्वेक्षणाच्या अहवालावरून समोर आलं आहे. स्वीस एअर मॉनिटरिंग बॉडी खट-ठ्ठी नं हा सर्वे केला असून त्यानुसार बांगलादेश आणि पाकिस्तानच्या पाठोपाठ भारत हा जगभरातील तिसरा सर्वाधिक प्रदूषित देश ठरला आहे. 'वर्ल्ड एअर क्वॉलिटी रिपोर्ट २०२३' च्या निष्कर्षांनुसार १३४ देशांच्या यादीत भारताचा प्रदूषित हवेच्या निकषांवर तिसरा क्रमांक लागतो. त्याशिवाय जगभरातील सर्वाधिक प्रदूषित ५० शहरांमध्ये एकट्या भारतातील ४२ शहरांचा समावेश आहे.

जगभरातील विविध देशांमधल्या हवेचा दर्जा तपासण्यासाठी पीएम २.५ चं प्रमाण हे मापक वापरण्यात आलं होतं. त्यानुसार भारतात प्रत्येक क्युबिक मीटर क्षेत्रात ५४.४ माक्रोग्रॅम पीएम २.५ चं केंद्रीकरण झाल्याचं निदर्शनास आलं. बांगलादेशमध्ये हे प्रमाण सर्वाधिक म्हणजेच ७९.९ मायक्रोग्रॅम प्रतीक्युबिक मीटर तर त्यापाठोपाठ पाकिस्तानमध्ये हे प्रमाण ७३.७ मायक्रोग्रॅम प्रतीक्युबिक मीटर इतकं आढळून आलं.

दरम्यान, एकीकडे सर्वाधिक प्रदूषित देशांच्या यादीत भारत तिसऱ्या स्थानी असताना दुसरीकडे सर्वाधिक प्रदूषित शहरांच्या यादीत भारतातल्या तब्बल ४२ शहरांचा समावेश आहे. जहभरातले सर्वाधिक प्रदूषित शहर बिहारमधील बेगुसराय ठरलं असून त्यापाठोपाठ गुवाहाटी व दिल्ली या दोन शहरांचा अनुक्रमे दुसरा व तिसरा क्रमांक लागतो. २०२३मध्ये बेगुसरायमध्ये प्रती क्युबिक मीटर पीएम २.५ चं प्रमाण ११८.९ मायक्रोग्रॅम इतकं आढळून आलं. गेल्या वर्षी हेच प्रमाण तब्बल १९.७ इतकं कमी होतं. गुवाहाटीमद्ये हेच प्रमाण २०२२ मधील ५१ वरून २०२३ मध्ये तब्बल १०५.४ मायक्रोग्रॅम प्रती क्युबिक मीटर इतकं वाढल्याचं आढळून आलं आहे. दिल्लीत हेच प्रमाण याच काळात ८९.१ वरून ९२.७ मायक्रोग्रॅम प्रती क्युबिक मीटर इतकं वाढल्याचं दिसून आलं आहे. । पान २ वर

# संपादकीय

## लोकशाहीचा उत्सव ..

देशातील लोकशाहीचा उत्सव आगामी काही काळात रंगणार आहे. केंद्रीय निवडणूक आयोगाने लोकसभा निवडणुकीच्या तारखा जाहीर केल्यामुळे आता येते काही दिवस प्रचार, आरोप-प्रत्यारोप, उत्तर-प्रतिउत्तर यांचा खेळ जोरदार रंगणार आहे. आजपर्यंतच्या भारतीय लोकशाहीच्या इतिहासातील सर्वात चुरशीची लोकसभा निवडणूक म्हणून या निवडणुकीकडे पाहावे लागणार आहे. कारण पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या नेतृत्वाखाली राष्ट्रीय लोकशाही आघाडी सतत तिसऱ्यांदा पुन्हा सत्तेवर येते का हे पाहणे जेवढे औत्सुक्याचे आहे तेवढेच मोदी यांना पर्याय म्हणून विरोधी पक्ष किती ताकदीने या निवडणुकीत उतरतात हे पाहणेसुध्दा महत्त्वाचे ठरणार आहे. देशात स्वातंत्र्यानंतर दीर्घकाळ सत्तेवर असलेला काँग्रेस या प्रमुख राष्ट्रीय पक्षाला मात्र इतर मित्र पक्षांच्या सहकार्यानेच मोदी यांना आव्हान उभे करावे लागणार आहे. काँग्रेसच्या पुढाकाराने स्थापन झालेल्या इंडिया आघाडीमध्ये अद्यापही एकजिनसीपणा नसला तरी आगामी कालावधीमध्ये प्रचाराच्या निमित्ताने ही इंडिया आघाडी आपली एकी दाखवून देईल ही आशा करावी लागेल. गेल्या काही दिवसांच्या कालावधीमध्ये विविध वृत्तवाहिन्यांनी जे ओपिनियन पोलचे निकाल जाहीर केले त्यामध्ये सर्वच वाहिन्यांनी भारतीय जनता पक्षाच्या नेतृत्वाखालील आघाडीच्या जागांमध्ये कमी जास्तपणा दाखवला आहे. गेल्या दहा वर्षांच्या कालावधीमध्ये नरेंद्र मोदी सरकारने जे काम केले आहे ते समोर ठेवूनच भाजपच्या प्रचाराचा केंद्रबिंदू आखला जाईल. मोदी सरकारने गेल्या दहा वर्षांमध्ये काहीच केले नाही हे ठामपणे मांडण्याचे काम विरोधी पक्ष करतील का, हा सर्वात महत्त्वाचा मुद्दा आहे. राजकीय पक्ष ज्या हिरीरीने या लोकशाहीच्या उत्सवात भाग घेणार आहेत तोच उत्साह सर्वसामान्य मतदारांनीसुध्दा दाखवायला हवा. लोकशाहीने त्यांना दिलेला मतदानाचा अधिकार त्यांनी गांभीर्याने आणि प्रामाणिकपणे अमलात आणायला हवा. जगातील सर्वच लोकशाही देशांना भारतीय लोकशाहीचे नेहमीच कौतुक वाटते. लोकसभा निवडणुकीच्या निमित्ताने सुरू झालेला जगातील सर्वात मोठा असा हा लोकशाहीचा उत्सव यावेळीसुध्दा आदर्शपणे पूर्णत्वास जाईल याची काळजी सर्वच घटकांनी घ्यायला हवी.

# रमजान विशेष

पवित्र रमजान महिन्याची सुर्वात रोजे (उपवास) पासुन होते.

उपासना मानवतेच्या सेवेचा रमजान सण इस्लाम धर्माच्या पाच मूलभूत स्तंभा पैकी एक आहे इस्लामचा पाया ईमान नमाज,जकात,रोजा आणि हज या पाच गोष्टींवर अवलंबून आहे इस्लाम मध्ये रमजान महिना हा पवित्र मानला जातो रमजान शब्दाचा अर्थ उष्ण आणि कोरडेपणा असा होतो या महिन्यात कुराण पठन करणे पुण्यकारक मानले जाते.



हजरत मोहम्मद पैगंबर यांनी एका हदिसमध्ये म्हटले आहे की जर एखाद्याने रमजानच्या महिन्यातील रमजानचा एक उपवास सोडला आणि त्याऐवजी आयुष्यभर रोजा उपवास केला तर त्याला रमजानच्या महिन्यात का महत्त्व नाही. रमजानच्या २७ व्या रोज्या रोजी महणजेच रमजानच्या २७व्या रात्री शब-ए-कद्र रोजी कुराण अवतरले रमजानच्या पवित्र महिन्यामध्ये तरावीहची नमाज २० रखात नमाज अदा करणे कुरान पठाण करणे आणि आपल्या स्वतःच्या समाजाच्या, घरातील,शेजारी,गल्लीतल्या,गावातल्या व देशाच्या प्रगतीसाठी बंधुत्वासाठी प्रेमासाठी अल्लाहकडे प्रार्थना करतात. आणि पवित्र अशा रमजान महिन्यांमध्ये दान-धर्म (जकात फित्रा) देणे याला रमजान मध्ये विशेष महत्त्व आहे.

जकात कुणावर फर्ज आहे.

जो मालदार है (पैसेवाला, श्रीमंत) त्याच्यावरती जकात फर्ज है, म्हणजे अनिवार्य आहे.जकात कुणाला देऊ शकतात,जकात सर्वात आदोगर पाहुण्यांवर हक्क आहे.म्हणजे जवळच्या पाहुणा गरीब आहे दोन टाईम जेवण करू शकत नाही असल्यावर जकात देऊ शकतात.गरीब,मिस्किन, यतीम(अनाथ),माजूर(कर्जदार),मजबूर(गरजवंत),बेवा(विधवा),यांच्यावर आपन जकात देऊ शकतात.

जकात म्हणजे काय आणि कसे देऊ उदाः-समजा तुमच्याकडे एक लाख रुपये आहे.त्याला २५००रुपये जकात देणे अनिवार्य आहे.घरात साडे सात तोळे सोने आहे.आजच्या बाजार भावाने म्हणजे ६५००० हजार रुपये तोळे भावाने साडे सात तोळ्याचे आजच्या बाजार भावाने साडे सात तोळे सोने असलेल्याना १३५०० हजार जकात अनिवार्य आहे.

भुकेल्यांना अन्न, तहानलेल्यांना पाणी, आजारी, गरजवंतांना मदत करावी, अशी कुरआनची शिकवण आहे. लोभ, व्याभिचार, अहंकार, अंधविश्वास आदींपासून दूर राहण्यास आणि अहिंसा, करूणा, शिक्षणाची संगत वाढविण्याची शिकवण दिली जाते. हा महिना वर्षभराचा मार्गदर्शक महिना आहे. त्यामुळे ईश्वराची कृपा व्हावी म्हणून कुरआन, नमाज पठण, रोजा केला जातो. अशा वेळी कुणीही उपाशीपोटी रोजा करणार नाही, याची काळजी घेतली जाते. आपल्या शेजारी किंवा गल्लीतील शाळेतील विद्यार्थी अशा व्यक्तींना शहरीसाठी अन्न उपलब्ध करून देण्याची आपली जबाबदारी असते.

चुकीच्या गोष्टी कानाने ऐकू नये, डोळ्यांनी वाईट पाहू नये, वाईट शब्द कोणाबद्दलही बोलू नये हाताने चांगले काम करावे एकंदरीत वाईट टाळून सत्य मार्गावर वाटचाल करण्याचे नाव रोजा आहे. रमजानच्या पवित्र महिन्यात (कोणाबद्दलही मनात द्वेष ठेवू नये) मन शुद्ध ठेवावे लागते. उपवास करताना कोणासाठी ही चुकीचे विचार मनात येऊ नये हाच पवित्र रोजा आहे. या पवित्र अशा रमजान महिन्यात गोरगरिबांना गरजूंना,गरजवंतांना, शक्य तितकी मदत करावी याचाच नाव रोजा आहे.

रमजान हा सण म्हणजे आनंदाचा आणि बंधू भावाचा.

महिनाभर उपवास झाल्यानंतर दुसऱ्या दिवशी ईद येते इस्लाम धर्माचा ईद हा सर्वात मोठा सण आहे. ईदची नमाज झाल्यावर एकमेकांना गळाभेट करून ईदच्या एकमेकांना शुभेच्छा देतात आणि एकमेकांच्या घरी जाऊन गोड पदार्थ सुरकुंबा पितात म्हणूनच रमजान ईदला गोड ईद असेही म्हणतात.

**– सोहेल फरास अक्कलकोट मो.९०२१६४४०३०**

# शासकीय योजनांतून महिलांचे सशक्तीकरण

मुख्यमंत्री एकनाथ शिंदे व राज्य शासन यांच्या पुढाकाराने राज्यभरातील महिलांच्या सशक्तीकरणासाठी अनेक शासकीय योजना राबविल्या जात आहेत. महिलांना सक्षम बनवण्यासाठी महिला आर्थिक विकास महामंडळ अनेक योजना राबवित आहे. माविमचे कोल्हापूर जिल्हा समन्वय अधिकारी सचिन कांबळे यांच्या मार्गदर्शनाखाली जिल्ह्यातील महिलांना माविमच्या अनेक योजनांचा लाभ दिला जात असून यामुळे महिला उद्योग उभारणीत पुढे येत असल्याचे दिसून येते. कोल्हापूर जिल्ह्यातील अनेक महिलांनी महिला आर्थिक विकास महामंडळाद्वारे अनेक योजनांचा लाभ घेऊन स्वतः सक्षम बनण्याबरोबरच अन्य महिलांनाही रोजगार उपलब्ध करून दिला आहे. जिल्ह्यातील महिलांनी साधलेल्या सर्वांगीण प्रगतीच्या यशोगाथा त्यांच्याच तोंडून**फुलशेतीतून साधली सर्वांगीण प्रगती** महिला आर्थिक विकास महामंडळ कोल्हापूर अंतर्गत अस्मिता लोकसंचालित साधन केंद्र बालिंगा येथून महिलांसाठी असणाऱ्या योजनांची माहिती मिळाली. यानंतर मी फुलशेती व्यवसाय करण्याच्या विचाराने पुण्यातील तळेगाव दाभाडे येथील फुलशेतीमध्ये प्रशिक्षण घेतले. नंतर अण्णासाहेब पाटील आर्थिक विकास महामंडळाकडून ६ लाख रुपयांचे अर्थसाह्य घेऊन करवीर तालुक्यातील कुडित्रे येथे फुलशेती (पॉलिहाऊस) सुरु केली.

**बेकरी उद्योगातून कुटुंबाला हातभार** हातकणंगले तालुक्यातील टोप येथे पिठाची गिरण सुरु केली होती. यानंतर या उद्योगाला बेकरी उत्पादन विक्रीचाही जोड दिला. महिला आर्थिक विकास महामंडळा अंतर्गत उन्नती लोकसंचलित साधन केंद्र, पेठ वडगाव या केंद्रांतर्गत प्रधानमंत्री सूक्ष्म अन्नप्रक्रिया योजनेतून २ लाख १२ हजार रुपयांचे कर्ज घेतले. यातून मला ३५ टक्के सबसिडी मिळाली. बेकरी उद्योगाला चांगला प्रतिसाद मिळू लागल्यामुळे वर्षाला साधारण ३ ते ४ लाख रुपयांचा नफा मला मिळतो. या उद्योगामुळे माझ्या कुटुंबाला आर्थिक दृष्ट्या हातभार लागला आहे. माझ्या मदतीसाठी अन्य दोन महिलांना मी रोजगार उपलब्ध करून दिला आहे. त्यांनाही दरमहा ६००० रुपये मानधन मी देते. राज्य शासन महिलांच्या विकासासाठी अनेक योजना राबवीत असून महिलांनीही या योजनांचा लाभ घ्यायला हवा. या योजनेचा लाभ माझ्यासह राज्यातील अनेक महिलांना मिळत असून त्यामुळे त्या प्रगती साधत आहेत यासाठी मी शासनाला धन्यवाद देते – सरिता सिसाळ, टोप, ता. हातकणंगले**लघु उद्योगातून कुटुंबाला आधार** कुटुंबाला हातभार लावण्याच्या उद्देशाने मला एखादा लघुउद्योग सुरु करायची इच्छा होती, पण मार्ग दिसत नव्हता. याचवेळी बचत गटांच्या माध्यमातून महिलांना कर्ज पुरवठा होत असल्याची माहिती मला मिळाली. मुख्यमंत्री रोजगार निर्मिती कार्यक्रमातून महिला आर्थिक विकास महामंडळ कोल्हापूर अंतर्गत स्थापित अस्मिता लोकसंकलित साधन केंद्र बालिंगा या संस्थेच्या अंतर्गत जोडलेल्या दुर्गामाता महिला स्वयंसहायता गटाच्या माध्यमातून मी ५ लाख रुपयांचे कर्ज घेतले. यातून औरंगाबाद येथून पीठ शिजवण्याचे व मळण्याचे मशीन, कुरडई व पापड मशीन खरेदी केले. कोल्हापूर जिल्ह्यातील करवीर तालुक्यातील कळंबे तर्फ कळे येथील आमच्या घरी हे मशीन आल्यानंतर लगेचच मी उन्हाळी पदार्थांचे उत्पादन तयार करण्यास सुरुवात केली. गहू, रवा, नाचणीच्या कुरडई, पापड, सालपापडी, नाचणी, तांदूळ, टोमॅटो, पालकाचे पापड, तिखट सांडगे, उडदाचे पापड, शाबूचे पळी पापड, उकड सांडगे, बटाटा शाबूचे मिक्स पापड, आंबा, लिंबू, मिरचीचे लोणचे असे पदार्थ तयार करुन मी त्याची विक्री करते. या उद्योगात मदतीसाठी आणखी २ महिला कार्यरत असून त्यांना दरमहा ४ हजार रुपयांपर्यंत मानधन देते. गौरी लघु उद्योगाच्या माध्यमातून हे सर्व उन्हाळी उत्पादन कोल्हापूर जिल्ह्याबरोबरच पुणे, मुंबई सारख्या शहरांमध्येही विक्रीसाठी पाठवले जातात. या उद्योगातून मला वर्षभरात २ लाख रुपयांचा नफा मिळतो. लघुउद्योगातूनही कुटुंबाला आधार देण्याबरोबरच महिला स्वतःच्या पायावर सक्षमपणे उभ्या राहू शकतात यासाठी महिलांनी शासकीय योजनांचा लाभ घ्यावा व आपली स्वप्नपूर्ती करावी – सविता शामराव सुतार, कळंबे तर्फ कळे, ता. करवीर. महिला आर्थिक विकास महामंडळ (माविम) मुळे महिलांच्या कुटुंबाला आर्थिक दृष्ट्या हातभार लागण्याबरोबरच स्वतः ची स्वप्नपूर्ती होत आहे. यासाठी राज्य शासनाचे आभारी असल्याचे मत जिल्ह्यातील अनेक लाभार्थी महिलांनी व्यक्त केले. **– वृषाली पाटील, माहिती अधिकारी, कोल्हापूर**

पान १ वरुन

## अजित पवार गटाला 'घड्याळ'

ही बाब दुर्लक्षित केली तर आयोगाने बंडखोरीला मान्यता दिल्यासारखे ठरेल व त्याआधारे फुटीर गट निवडणूक चिन्हावर दावा करू शकतील. ही मतदारांची चेष्टा नव्हे का, असा सवाल न्या. विश्वनाथन यांनी अजित पवार गटाचे वकील मुकुल रोहतगी यांना केला. बंडखोरीला प्रोत्साहन देणे हा दहाव्या अनुसूचीचा हेतू नव्हता, असे न्या. कांत यांनी स्पष्ट केले.

त्याच वेळी 'घड्याळ' या निवडणूक चिन्हाच्या हक्काचा वाद न्यायप्रविष्ट असून या प्रकरणावर सर्वोच्च न्यायालय अंतिम निकाल देत नाही तोपर्यंत हंगामी वापर केला जात आहे, अशी सर्व माध्यमांतून घोषणा करण्याचा आदेश न्यायालयाने अजित पवार गटाला दिला. घड्याळ चिन्ह वापरायचे असेल तर चिन्हाच्या हक्काचा वाद मिटलेला नसल्याचे जाहीरपणे सांगावे लागेल, अशी सूचना खंडपीठाने केली. गेल्या वेळी झालेल्या सुनावणीत न्यायालयाने अजित पवार गटाला शरद पवार यांचे नाव व छायाचित्र वापरण्यास मनाई केली होती.

**अजित पवार गटाला दणका**

✲ इंग्रजी, मराठी, हिंदी वृत्तपत्रांमध्ये जाहीर नोटीस प्रसिद्ध करावी. ✲ घड्याळ चिन्हाच्या हक्काचे प्रकरण न्यायप्रविष्ट असून त्याचा कायमस्वरूपी वापर न्यायालयाच्या अंतिम निकालावर अवलंबून असेल, असे जाहीर करावे. ✲ प्रत्येक टेम्पलेट, जाहिरात, ऑडिओ किंवा व्हिडीओ संदेशामध्ये या सूचनेचा समावेश करावा.

## सीएएला स्थगिती देण्यास

विरोध केला. सिब्बल म्हणाले, सीएए पारित होऊन चार वर्षे झाली आहेत. चार वर्षांत त्यांनी (केंद्र सरकार) अशी माहिती गोळा करून ठेवायला हवी होती. तसेच आता लोकांना नागरिकत्व बहाल केलं गेलं तर नंतर ते नागरिकत्व काढून घेणं अवघड होईल. तसं झाल्यास या सर्व याचिका कुचकामी ठरतील. चार वर्षांनंतर केंद्राला अशी कुठली घाई होती की अचानक त्यांनी यासंबंधीची अधिसूचना काढली? त्यामुळे न्यायालयाने या अधिसूचनेवर स्थगिती द्यावी.

दरम्यान, याचिकाकर्त्यांकडून उपस्थित असलेल्या वकील इंदिरा जयसिंह यांनी सीएए बंदी घालण्याची मागणी केली. तसेच त्या म्हणाल्या, हे प्रकरण वरिष्ठ खंडपीठाकडे पाठवायला हवं. त्यावर सरन्यायाधीश म्हणाले, केंद्र सरकारला काही वेळ मागण्याचा अधिकार आहे आणि आपण त्यांना तो वेळ दिला पाहिजे.

भारताच्या संसदेने ११ डिसेंबर २०१९ रोजी सीएए पारित केला होता. परंतु, सीएएमुळे देशातील मुस्लिमांना लक्ष्य केले जाण्याचा धोका असल्याचा मुद्दा उपस्थित करत विविध राज्यांमध्ये या कायद्याला तीव्र विरोध झाला होता. देशभर हिंसक विरोध होऊ लागल्यामुळे केंद्र सरकारने कायद्याची अंमलबजावणी लांबणीवर टाकली होती. आता निवडणुकीच्या तोंडावर कायदा लागू केल्यामुळे भाजपशच्या हाती राजकीय आयुध मिळाल्याचे मानले जात आहे. या कायद्यात ३१ डिसेंबर २०१४ पूर्वी अथवा त्या दिवशी बांगलादेश, पाकिस्तान आणि अफगाणिस्तानमधून भारतात आलेल्या गैर-मुस्लीम स्थलांतरितांना नागरिकत्व देण्याची तरतूद आहे. यामध्ये हिंदू, शीख, बौद्ध, जैन, पारशी आणि ख्रिश्चन या धर्मातील अल्पसंख्याकांचा समावेश आहे.

## अवकाळी पावसानं झोडपलं!..

वारा सुरू होता. अखेर सायंकाळच्या सुमारास सडक अर्जुनी तालुक्यात वादळी वाऱ्यासह गारांचा पाऊस बरसला आहे. या पावसाचा फटका हा गहू पिकांसह भाजीपाला पिकांना देखील बसणार आहे.

वर्ध्याच्या पवनार येथे वादळी वाऱ्यासह गारपीट झाली आहे. अनेक घरावरील टीनपत्रे उडाली, तर उभी झाडे सुद्धा कोसळली आहेत. अजूनही बऱ्याच शेतकऱ्यांचा गहू आणि चणा पिक काढणी शिल्लक आहे, त्या पिकांचं सुद्धा मोठ्या प्रमाणात नुकसान होण्याची शक्यता आहे. पाऊस आणि गारपीट यामुळे केळीच्या बागेचं सुद्धा नुकसान झालं आहे. अचानक झालेल्या या वादळ गारपिटीने मोठं नुकसान झालं आहे. अनेक ठिकाणी वीजपुरवठा देखील खंडित झाला आहे.

नागपूर जिल्ह्यातील पारशिवनीमध्ये मंगळवारी दुपारी चार वाजताच्या सुमारास गारपीटसह जोरदार पाऊस पडला. गेल्या दोन दिवसांपासून संध्याकाळच्या सुमारास नागपूर जिल्ह्यात अनेक ठिकाणी अवकाळी पाऊस होत होता. एक दोन ठिकाणी किरकोळ गारपीटही झाली. मात्र पारशिवनी तालुक्यात झालेल्या अवकाळी पावसासह जोरदार गारपीटही झाली. मंगळवारी झालेल्या अवकाळी पाऊस आणि गारपीटीमुळे परिसरातील शेतीचं नुकसान होण्याची शक्यता आहे.

चंद्रपूर जिल्ह्यातील वातावरणात अचानक बदल झाल्याचं पाहायला मिळत आहे. काही भागात काळ्याकुट्ट ढगांची गर्दी होऊन अवकाळी पावसाच्या सरी बरसल्या. कोरपना तालुक्यात पावसासह गारपीट झाली. हवामान विभागाने दोन दिवस जिल्ह्यातील वातावरण बदलाचे संकेत दिले होते. पावसाचा मिर्ची पिकाला काही प्रमाणात फटका बसण्याची शक्यता वर्तवण्यात येत आहे.

## निवडणूक प्रक्रिया निर्भय वातावरणात

होणार नाही याची काळजी घ्यावी,अशा सूचना श्री.चोक्कलिंगम यांनी यावेळी दिल्या.

ईएसएमएस ॲप

निवडणूक अधिक मुक्त व निष्पक्ष वातावरणामध्ये व्हावी, यासाठी आचारसंहितेच्या कालावधीत राज्यातील विविध केंद्र सरकार व राज्यशासनाच्या अंमलबजावणी यंत्रणांकडून बेकायदेशीर पैसा, दारु, अंमली पदार्थ व भेटवस्तू, मौल्यवान धातू, इ. गोष्टी जप्त करण्यात येणार आहे. या जप्तीची माहिती भारत निवडणूक आयोगास दर दिवशी एडवस -ईंी ईीैोत्र वरुन कळविण्यात येत आहे. याची अंमलबजावणी प्रभावीरित्या करण्याबाबत या बैठकीत निर्देश देण्यात आले.बैठकीस राज्य उत्पादन शुल्क, पोलीस, कस्टम, आयकर, केंद्रीय सेवा शुल्क, टपाल विभाग, रेल्वे, विमानतळ प्राधिकरण, सागरी सुरक्षा विभाग, वन विभाग यांच्यासह संबंधित राज्य तसेच केंद्रीय यंत्रणांचे वरिष्ठ अधिकारी उपस्थित होते.

## लोकसभा सार्वत्रिक निवडणूक

आयोगाने निश्चित केलेल्या कागदाच्या आकारामध्ये नमुना मतपत्रिका छापणे आदी बाबींवर निर्बंध घालण्यात येत आहेत. नमुना पत्रिका छपाईस निवडणूक प्रक्रिया पूर्ण होईपर्यंत म्हणजेच ६ जून २०२४ पर्यंत संपूर्ण जिल्ह्यात निर्बंध घालण्यात येत आहेत. असे आदेश जिल्हाधिकारी तथा जिल्हा निवडणूक अधिकारी कुमार आशीर्वाद यांनी दिले आहेत.

## लाजिरवाणा विक्रम: सर्वाधिक

भारतातील इतर शहरे कोणती?

बेगुसराय, गुवाहाटी आणि दिल्लीव्यतिरिक्त ग्रेटर नोएडा (११), मुझफ्फरनगर (१६), गुरगाव (१७), अराह (१८), दादरी (१९), पाटणा (२०), फरिदाबाद (२५), नोएडा (२६), मीरत (२८), गाझियाबाद (३५) आणि रोहतक (४७) या शहरांचा या यादीत समावेश आहे.

दरम्यान, या सर्वेक्षणासाठी नेमकी माहिती कशी गोळा करण्यात आली, याबाबतही खट-ळी कडून स्पष्टीकरण देण्यात आलं आहे. या सर्वेक्षणासाठी १३४ देशांमधील ७ हजार ८१२ ठिकाणी उभारण्यात आलेल्या तब्बल ३० हजार एअर स्टेशनच्या माध्यमातून माहिती गोळा करण्यात आली.

# मधुमेहाच्या रूग्णांसाठी आवश्यक शुगर स्पाइक टेस्ट, जाणून घ्या ती कधी करायची

देशात मधुमेहाचा आजार दिवसेंदिवस झपाट्याने वाढत आहे. शहरी भागात तर परिस्थिती बिकट आहे. पूर्वी या आजाराचे रुग्ण वयाच्या ५० वर्षांनंतर यायचे, पण आता वयाच्या ३० व्या वर्षी लोक टाइप-२ मधुमेहाचे बळी ठरत आहेत. हा आजार टाळण्यासाठी जीवनशैली योग्य ठेवणे आवश्यक आहे. रक्तातील साखरेची पातळी देखील दररोज तपासणे आवश्यक आहे. या सगळ्याशिवाय शुगर स्पाइक्स टेस्टही करायला हवी.



जर तुमच्या रक्तातील साखरेची पातळी दीर्घकाळ जास्त राहिली, तर त्यामुळे मधुमेह होऊ शकतो. अशा स्थितीत प्रत्येक दुसऱ्या ते तिसऱ्या दिवशी स्पाइक्स टेस्ट करणे आवश्यक आहे. डॉक्टरांच्या मते, मधुमेही रुग्णांनी जेवणापूर्वी आणि जेवणानंतर साखरेची पातळी तपासली पाहिजे.

जर दुपारच्या जेवणानंतर साखरेची पातळी जास्त दिसत असेल, तर हे लक्षण आहे की तुम्हाला तुमचा आहार बदलण्याची गरज आहे. हे असे संकेत आहेत की तुम्हाला तुमच्या आहारात कमी ग्लायसेमिक इंडेक्स असलेल्या कार्ब्सचे सेवन करावे लागेल. यासाठी भरड धान्य, हिरव्या भाज्यांचा आहारात समावेश करावा.शुगर स्पाइक्स टेस्टमध्ये जर साखरेची पातळी जास्त असेल तर हे लक्षण आहे की तुम्हाला शारीरिक काम करण्याची गरज आहे. यासाठी रोज व्यायाम करा. तुम्ही जिमला जाणे आवश्यक नाही. तुम्ही घरी किंवा उद्यानातच हलका व्यायाम करू शकता. दररोज योगासने आणि प्राणायाम करणे देखील खूप फायदेशीर आहे. व्यायामासोबतच तुम्हाला शरीर हायड्रेट ठेवावे लागते. यासाठी रोज किमान सात ते आठ ग्लास पाणी प्यावे.

मधुमेहाच्या रुग्णांनी त्यांचे औषध वेळेवर घ्यावे. डॉक्टरांनी काही औषधे दिली असतील तर ती वेळेत घ्यायला विसरू नका. औषधे घेण्यासोबतच जीवनशैली योग्य ठेवावी. झोपेच्या आणि उठण्याच्या वेळा सेट कराव्या. किमान सात ते आठ तासांची झोप घ्यावी. या नियमांचे पालन केल्यास रक्तातील साखर नियंत्रणात राहते.

# 'दिलखुलास', 'जय महाराष्ट्र' कार्यक्रमात सह संचालक डॉ. विवेक पाखमोडे यांची मुलाखत

मुंबई : माहिती व जनसंपर्क महासंचालनालय निर्मित 'दिलखुलास' आणि 'जय महाराष्ट्र' कार्यक्रमात वैद्यकीय शिक्षण आणि संशोधन संचालनालयाचे सह संचालक डॉ. विवेक पाखमोडे यांची मुलाखत प्रसारित होणार आहे.जगभरात तोंडाचे आरोग्य सुधारावे यासाठी दरवर्षी २० मार्च रोजी 'जागतिक मौखिक आरोग्य दिन' पाळला जातो. यानिमित्त राज्यामध्ये सजगता यावी यासाठी विविध जनजागृतीपर उपक्रम राबविण्यात येतात.

वाढत्या वयानुसार होणाऱ्या आजारांचा आणि औषधांचाही ज्येष्ठांच्या मौखिक आरोग्यावर परिणाम होतो. त्याअनुषंगाने मौखिक आजाराचे प्रकार आणि या आजारांबाबत काय काळजी घेणे आवश्यक आहे, याबाबत 'दिलखुलास' आणि 'जय महाराष्ट्र' कार्यक्रमातून सह संचालक डॉ. पाखमोडे यांनी माहिती दिली आहे.'दिलखुलास' कार्यक्रमात डॉ. पाखमोडे यांची मुलाखत बुधवार दि. २०, गुरुवार दि. २१ आणि शुक्रवार दि.२२ मार्च २०२४ रोजी आकाशवाणीच्या सर्व केंद्रावरून व न्यूज ऑन एआयआर' या मोबाईल पवर सकाळी ७.२५ ते ७.४० या वेळेत ऐकता येणार आहे, तर 'जय महाराष्ट्र' कार्यक्रमात ही मुलाखत बुधवार दि. २० मार्च २०२४ रोजी सायंकाळी ७.३० वाजता महासंचालनालयाच्या समाजमाध्यमांच्या पुढील लिंकवर पाहता येणार आहे. निवेदक रितली तपासे यांनी ही मुलाखत घेतली आहे.

हे वृत्तपत्र मालक, सिद्धार्थ सोशल फौंडेशन यांनी, मुद्रक, प्रकाशक, संपादक, कमलाकर ज्ञानदेव सोनकांबळे यांच्या सम्यक पब्लिकेशन्स अँड प्रिंटर्स २४७, बुद्ध विहार , रमाबाई आंबेडकर नगर, बुधवार पेठ सोलापूर ४१३००२ महाराष्ट्र येथे छापून मु.पो. गोगांव ता. अक्कलकोट जि सोलापूर ४१३२१८ महाराष्ट्र येथे प्रकाशित केले. संपादक : कमलाकर ज्ञानदेव सोनकांबळे email ; yashsiddhinews@gmail.com www.yashsiddhinews.com mo: 9921988358

This newspaper is printed by the Owner , Shidharth Social Foundation, Printer, Publisher, Editor, Kamalakar Dayndev Sonakamble at Samyak Publications and Printers 247, Budha Vihar, Ramabai Ambedkar Nagar, Budhwar Peth Solapur 413002 [Maharashtra], Published, at Gogaon Tal Akkalkot Dist Solapur 413218 [Maharashtra]. Editor : Kamalakar Dayndev Sonakamble

दैनिक
यश सिद्धि न्यूज



# निर्माल्य निर्वाणातून नवा उद्योग निर्माण होवू शकतो : माजी कुलगुरू डॉ. देवानंद शिंदे

पंढरपूर/प्रतिनिधी : पंढरपूर हे महाराष्ट्रातील पवित्र असे तीर्थक्षेत्र आहे. येथील निर्माल्याचा प्रश्न प्रशासनाला भेडसावत राहतो. निर्माल्याची समस्या सोडविण्यासाठी उद्योजक आणि संशोधकांनी पुढे आले पाहिजे. निर्माल्य निवार्णातून एखादा नवा उद्योग निर्माण होवू शकतो. तुळशीवर प्रक्रिया करून त्यातून नवनवीन उत्पादने घेता येवू शकतात. यादृष्टीने संशोधन व्हायला हवे. पंढरपूर ही आध्यात्मिक राजधानी आहेच; मात्र औद्योगिक दृष्ट्या पंढरपूरचा विकास करण्यासाठी प्रयत्न झाले पाहिजेत. असे प्रतिपादन शिवाजी विद्यापीठाचे माजी कुलगुरू डॉ. देवानंद शिंदे यांनी केले.




रयत शिक्षण संस्थेच्या येथील कर्मवीर भाऊराव पाटील स्वायत्त महाविद्यालयात रुसा काम्पोनंट ८ अंतर्गत महाविद्यालय अंतर्गत गुणवत्ता समिती, उद्योजकता सेल आणि वाणिज्य उद्योजकता कौशल्य विभाग यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित 'इंडस्ट्री अकॅडमीया मीट (कॅम्पस टू कॉर्पोरेट कनेक्ट) या उपक्रमात प्रमुख मार्गदर्शक म्हणून ते बोलत होते. यावेळी मंचावर कार्यक्रमाचे अध्यक्ष महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. चंद्रकांत खिलारे, सकाळ समूहाचे अमोल बिरारी, गंधाली दिंडे, समाधान काळे, अमरजीत पाटील, अमर पाटील, उपप्राचार्य डॉ. बजरंग शितोळे, उपप्राचार्य डॉ. भगवान नाईकनवरे, उपप्राचार्य प्रा. राजेश कवडे, अधिष्ठाता डॉ. बाळसाहेब बळवंत, अधिष्ठाता डॉ. अनिल चोपडे, शिवाजी विद्यापीठाचे डॉ. डी. के. गायकवाड आदी मान्यवर उपस्थित होते. या कार्यक्रमाचे प्रास्ताविक व प्रमुख मान्यवरांचा परिचय डॉ. अमर कांबळे यांनी करून दिला.

कुलगुरू डॉ. देवानंद शिंदे पुढे म्हणाले की, ज्ञानाला कोणत्याही मर्यादा नाहीत. शाळा महाविद्यालयातून मिळालेले ज्ञान समाजजीवनात वापरण्याचे कौशल्ये विद्यार्थ्यांमध्ये विकसित झाले पाहिजे. सर्वांना सोबत घेवून जाण्यात खऱ्या अर्थाने देशाची प्रगती आहे. त्यामुळे शाश्र्वत विकास होईल. केलेल्या कामाचे दस्तऐवजीकरण आपणास करता आले तर त्याचा पुढील कार्यासाठी चांगला उपयोग होतो. उद्योजकांनी महाविद्यालयासोबत सामंजस्य करार करणे ही काळाची गरज निर्माण झाली आहे. उद्योजक आणि महाविद्यालये यांनी समान कार्यक्रमाची आखणी केली तर युवकांना मोठ्या प्रमाणात रोजगाराच्या संधी निर्माण होतील.

पॅनल चर्चेच्या सत्राचे प्रास्ताविक व सर्व उद्योजकांचा सत्कार प्राचार्य डॉ. चंद्रकांत खिलारे यांनी केला. उपस्थित उद्योजकांनी त्यांच्या इंडस्ट्रीजची माहिती दिली. नाशिक, कोल्हापूर, सांगली, हैद्राबाद, पुणे, सोलापूर, अकलूज, मुंबई इत्यादी ठिकाणाहून पन्नासपेक्षा अधिक कंपन्यानी सहभाग घेतला. औषध निर्माण कंपनी, माहिती आणि तंत्रज्ञान, जैव तंत्रज्ञान, खत निर्मिती, अन्न प्रक्रिया उद्योग, कापड उद्योग, प्रकाशन संस्था, साखर कारखाना, टूर्स आणि ट्रॅवल्स, प्रसिद्धी माध्यमे इत्यादी क्षेत्रातील कंपन्यांचा समावेश होता. पॅनल चर्चेच्या सत्राच्या अध्यक्षस्थानी कुलगुरू डॉ. देवानंद शिंदे हे होते.

या बैठकीत महाविद्यालयासाठी आवश्यक असणाऱ्या इंटर्नशिप, हंड्स ऑन अँड ऑन दी जॉब ट्रेनिंग, , रिसर्च प्रोजेक्ट अँड रिसर्च फंडिंग, सामंजस्य करार, प्लेसमेंट, डेप्युटेशन ऑफ फॅकल्टी, स्टुडन्ट फॉर इंडस्ट्री एक्स्पोजर इत्यादीसाठी महाविद्यालयासोबत कार्यरत राहण्याची त्यांनी तत्परता दर्शविली. या चर्चेमध्ये उद्योजकांना आवश्यक असलेल्या बाबींचा अभ्यासक्रमात समावेश कशापद्धतीने असावा. यावर विस्तृत चर्चा करण्यात आली.

# खडवली नदीवरील गवताच्या निवारा शेडला भिषण आग



भिवंडी/मिलिंद जाधवः भिवंडी तालुक्यातील सोर गावाच्या हद्दीत असलेल्या खडवली येथील भातसा नदीवरील पर्यटकांसाठी तयार केलेल्या गवताच्या निवारा शेड भिषण आगीत जळून खाक झाल्या आहेत. खडवली येथील भातसा नदी ही बारमाही वाहणारी नदी आहे. त्यामुळे भिंवडी, कल्याण व मुंबई उपनगरातुन मध्य रेल्वेच्या खडवली स्टेशनवरुन व मुंबई नाशिक महामार्गावरील खडवली फाटा येथुन दररोज शेकडो नागरिक पिकनिक व दशक्रिया विधीसाठी येत असतात व येथील गवताच्या शेडखाली थांबुन नागरीक पिकनिक साजरी व दशक्रिया विधी करीत असतात त्यासाठी स्थानिकांनी बाहेरून येणाऱ्यां पर्यटकांसांठी नदीच्या पात्रात कडेला गवताच्या निवारा शेडची उभारणी केली असुन त्यापासून त्यांना रोजगार उपलब्ध झाला आहे. रविवारी दुपारी पर्यटकांच्या गर्दीत या गवताच्या शेडनां अचानक आग लागून आगीने रौद्र रूप धारण केले होते. त्यात सात आठ शेड जळुन खाक झाल्या आहेत. आग एवढी भिषण होती की आगीच्या धुराचे लोळ दुरवरून दिसुन येत होते या आगीत जिवीत हानी झाली नसली तरी शेड धारकांचे ऐन पर्यटक नदीवर येण्याच्या हंगामात हजारो रुपयांचे नुकसान झाले आहे. स्थानिक नागरिकांच्या मदतीने आगीवर नियंत्रण मिळवण्यात यश आले असुन आगीचे कारण अद्याप समजू शकले नाही.

# भारतीय बौद्ध महासभा यांच्या वतीने होणार तुळजापूर मध्ये मे महिन्यात बौद्ध धम्म परिषदेचे आयोजन

## राष्ट्रीय कार्याध्यक्ष डॉ भीमराव आंबेडकर यांची घेतली धाराशिव जिल्ह्याच्या पदाधिकाऱ्यांनी भेट

नळदुर्ग/दादासाहेब बनसोडे : तुळजापूर ऐतिहासिक शहरात दि बुद्धिस्ट सोसायटी ऑफ इंडिया अर्थात भारतीय बौद्ध महासभा या संस्थेच्या वतीने तुळजापूर आणि परिसरामध्ये बौद्ध संस्कारांचं जतन आणि पठण व्हावं बौद्ध संस्कार प्रत्येक घरा घरांमध्ये रुजावे बौद्ध संस्कारांची एक नाळ शहरात आणि परिसरात निर्माण व्हावी जिल्ह्यामध्ये समता स्वतंत्र्य आणि बंधुता समानता आणि अखंडता निर्माण व्हावी बौध्दांचे संस्कार प्रत्येक गावात प्रत्येक घरात पोहोचवण्यासाठी तुळजापूर या ऐतिहासिक शहरात मे महिन्यात बौद्ध पौर्णिमेचे औचित्य साधून बौद्ध धम्म परिषदेचे आयोजन करण्यात आलेले आहे या संदर्भात ती बुद्धिस्ट सोसायटी ऑफ इंडिया अर्थात भारतीय बौद्ध महासभेचे राष्ट्रीय कार्याध्यक्ष आदरणीय डॉ भीमराव यशवंतराव आंबेडकर यांची धाराशिव जिल्ह्याचे दक्षिण पदाधिकारी जिल्हाध्यक्षा विजयमाला धावारे ताई जिल्हा सरचिटणीस विद्यानंद वाघमारे , जिल्हा कोषाध्यक्ष राजश्रीताई कदम , जिल्हा संस्कार विभागाचे उपाध्यक्ष



बाळासाहेब बागडे , जिल्हा पर्यटन विभागाचे उपाध्यक्ष विश्र्वास भाऊ पांडागळे , जिल्हा संघटक विजय बनसोडे , जिल्हा कार्यालयीन सचिव दादासाहेब बनसोडे , आदींनी राष्ट्रीय कार्याध्यक्ष डॉ भीमराव यशवंतराव आंबेडकर यांची भेट घेऊन मे महिन्यामध्ये होणाऱ्या धम्म परिषदे साठी निमंत्रण देण्यात आले आहे .

बौद्ध संस्कारक्षम पिढी निर्माण करण्यासाठी धाराशिव दक्षिण विभाग कटिबद्ध आसुन होऊ घातलेल्या बौद्ध धम्म परिषदे साठी बौद्ध बांधवांनी व आंबेडकर प्रेमी जनतेने मोठ्या संख्येने उपस्थित राहण्यासाठी प्रसार आणि प्रचार खुप मोठ्या प्रमाणात होणार आहे समाजातील धाराशिव जिल्ह्यातील दक्षिण आणि उत्तर तमाम बौद्ध बांधव , बौद्धाचार्य , केंद्रीय शिक्षक, माजी श्रामनेर , शिक्षक , शासकीय, निम शासकीय कर्मचारी या सर्वांनी तुळजापुरात होऊ घातलेल्या बौद्ध धम्म परिषदेस उपस्थित राहून आपल्या सर्वांचे आदर्श आदरणीय डॉ भीमराव आंबेडकर यांना ऐकण्यासाठी आहे आपण उपस्थित रहावे आसे अवहान दक्षिण जिल्हा पदाधिकारी यांनी केले आहे .

# भैरवनाथ शुगर चषक क्रिकेट स्पर्धांचे बक्षीस वितरण समारंभ संपन्न

पंढरपूर/प्रतिनिधीः डॉ.तानाजीराव सावंत आरोग्य मंत्री यांच्या वाढदिवसाच्या निमित्ताने या स्पर्धा आयोजित करण्यात आलेल्या क्रिकेट स्पर्धाचे बक्षीस वितरण सोहळा शिवाजीराव सावंत यांच्या हस्ते करण्यात आलायाप्रसंगी क्रिकेट हा असा खेळ आहे की तो कोणत्याही क्षणी धावपटून टाकणारा असा खेळ आहे असे मनोगत प्रा शिवाजीराव सावंत यांनी आज रेल्वे ग्राउंड पंढरपूर येथे भैरवनाथ शुगर चषक क्रिकेट स्पर्धा आयोजित करण्यात आली होती या स्पर्धेच्या निमित्ताने बक्षीस वितरण समारंभामध्ये व्यक्त केले




डॉ.तानाजीराव सावंत आरोग्य मंत्री यांच्या वाढदिवसाच्या निमित्ताने या स्पर्धा आयोजित करण्यात आलेल्या होत्या व या स्पर्धेच्या अंतिम फेरीत विजय झालेल्या स्पर्धकांना रोख रक्कम ट्रॉफी ही देण्यात आली या क्रिकेट स्पर्धेमध्ये बेस्ट फास्ट बॉलर म्हणून पंढरपूर येथील दिनेश शिंगाडे तसेच बेस्ट बॅट्समन म्हणून जय बनकर त्याचप्रमाणे मॅन ऑफ द मॅच धीरज कोळी मॅन ऑफ द सिरीज धीरज कोळी यांना ट्रॉफी देऊन सन्मान करण्यात आला

भैरवनाथ शुगर चे प्रथम क्रमांकाचे चॅम्पियनशिप ट्रॉफी ही बक्षीस रोख रक्कम एक लाख ३१ हजार रुपये पारितोषिक एक हजार पीपी संघ या संघाला देण्यात आले त्याचप्रमाणे द्वितीय पारितोषक निमगाव टीम रोख रक्कम ७५ हजार रुपये ट्रॉफी देण्यात आली बोरगाव तथा अकलूज या संघाला तिसरे बक्षीस ४१ हजार रुपये ट्रॉफी देण्यात आली व चौथ्या क्रमांकाचे बक्षीस मातोश्री संघ रोख रक्कम २०००० रुपये ट्रॉफी प्रदान करण्यात आली

या परिस्थितीत या पारितोषिक वितरणाच्या समारंभासाठी उपस्थित मान्यवर माजी नगराध्यक्ष नागेश भोसले नगरसेवक आदित्य फत्तेपूरकर संजय बनपट्टे शाम भोगाव सर वैभव बडवे नगरसेवक धोत्रे भैरवनाथ वरचे प्रमुख अनिल सावंत आणि मान्यवर मंडळी उपस्थित होती

# भारतीय बौध्द महासभा अक्कलकोट तालुक्याच्या वतीने ग्रामसेवक अशोक म्हेत्रे यांचा सत्कार




दुधानी /प्रतिनिधी :सोलापूर जिल्हा ग्रामसेवक पतसंस्था पंढरपूर नूतन चेअरमन पदी अक्कलकोट तालुक्याचे सुपुत्र व ग्रामसेवक श्री. अशोक म्हेत्रे सर यांचा एकमताने बिनविरोध निवड करण्यात आली आहे त्यांच्या या निवडीने अक्कलकोट तालुक्यात आनंदिचे वातावरण पसरले आहे.

सोलापूर जिल्हा ग्रामसेवक पतसंस्थेच्या चेअरमनपदी श्री अशोक म्हेत्रे सर यांची निवड झाल्याबद्दल त्यांचा भारतीय बौद्ध महासभा अक्कलकोट तालुक्याच्या वतीने व मानव सेवा फाउंडेशन या संस्थेच्या वतीने सत्कार करण्यात आला तसेच नूतन व्हा.चेअरमन श्री. धनाजी गोतसूर्य.मानद सचिव श्री. महादेव भुसे. सर्व नूतन संचालक यांचे अभिनंदन व पुढील वाटचालीस मनःपूर्वक शुभेच्छा देण्यात आले.यावेळी संस्थेचे अध्यक्ष व तालुका अध्यक्ष दत्ता कांबळे, दुधनी कृषी उत्पन्न बाजार समितीचे संचालक इरांण्णा दसाडे, हालहल्ली मा. सरपंच विश्र्वनाथ ईटेनावरू, ग्रामसेवक संघटना तालुका अध्यक्ष अभय नेलुरे सर, ग्रामसेवक चव्हाण सर तुळजापूर, विस्तार अधिकारी पठाण सर,डॉ. दिनेश मुरूमकर तालुका पशुधन विकास अधिकारी, मेहबूब मनेरी पशुधन पर्यवेक्षक सलगर,औदुंबर व्यवहारे पशुधन पर्यवेक्षक मैंदर्गी, रवि बॉस गायकवाड, संगोळगी सरपंच बसवराज निम्मे, पत्रकार निंगप्पा निंबाळ, विस्तार अधिकारी धोडमनी सर, पत्रकार समाधान अहिरे, अकाऊंटट अनिल बिराजदार सर, उडगी ग्रामसेवक वाघमोडे सर,भीमा व आदी कार्यकर्ते व कर्मचारी उपस्थित होते.

# श्री सन्मती सेवा दल बहुउद्देशीय अल्पसंख्याक संस्था आयोजित नूतन संचालक मंडळ पदग्रहण समारंभ



पंढरपूर/प्रतिनिधी : संस्थेच्या वतीने आज संस्थेच्या रौप्यमहोत्सवी वर्षाचे संचालक मंडळ पदग्रहण समारंभ श्रीराम मंगल कार्यालय येथे आयोजित केला होता. नूतन अध्यक्ष म्हणून श्री.नमन धर्मेंद्र गांधी (पंढरपूर), उपाध्यक्ष श्री.तेजस प्रितम गांधी (अकलूज), सचिव श्री.अमोल श्रीकांत दोशी (मुंबई), सहसचिव श्री.तीर्थंकर णमोकर दोशी (भिगवण), खजिनदार श्री.रत्नकुमार राजकुमार फडे (अकलूज), सहखजिनदार श्री. आकाश मनोज गांधी (करमाळा), प्रसिद्धीप्रमुख श्री.देशभूषण भारत रणदिवे (वैराग), सहप्रसिद्धीप्रमुख श्री. अरिहंत सुनील फडे (श्रीपूर) यांची निवड करण्यात आली .यावेळी संस्थेचे माजी अध्यक्ष यांच्या हस्ते भगवान महावीरांच्या प्रतिमेचे अनावरण करण्यात आले. भगवान महावीरांच्या प्रतिमेस माल्यार्पण रसिकभाई कोठडिया, राजेश शहा, मरवडेकर, शाम पाटील, अतुल गांधी यांनी केले. दीपवज्वलन करुन कार्यक्रमाचे उद्घाटन डॉ.लक्ष्मण आसबे, सी.ए.शशील गांधी,धर्मेंद्र गांधी, डॉ. शितल फडे, राजकुमार गांधी, डॉ . सुर्यकांत दोशी, संतोष फडे यांनी केले.सुमनश्री महिला मंडळ, पंढरपूर यांनी मंगलाचरण करुन उपस्थितांना मंत्रमुग्ध केले.

संस्थेचे संस्थापक अध्यक्ष मिहीरभाई गांधी प्रास्ताविकातून संस्थेमार्फत करण्यात येत असलेल्या उपक्रमाची माहिती दिली. संस्थेच्या कार्याचा आढावा त्यांनी घेतला. डॉ.लक्ष्मण आसबे यांचा सत्कार नूतन अध्यक्ष नमन गांधी,उपाध्यक्ष तेजस गांधी यांनी केला, सी.ए.शशिल गांधी यांचा सत्कार अमोल दोशी व तीर्थंकर दोशी यांनी केला. उपस्थित सर्व मान्यवरांचे स्वागत यावेळी नूतन संचालक मंडळाच्या हस्ते करण्यात आले.

यावर्षीच्या पदग्रहण समारंभाचे वैशिष्ठ होते ते आयोजित केलेले व्याख्यान डॉ.लक्ष्मण आसबे यांनी जागर समृद्धीचा या विषयावर आपले विचार मांडले. ते बोलताना म्हणाले की एखाद्या व्यक्तीने सर्वांगीण विकास केला तर तो माणूस समृद्ध मनुष्य असतो.

माणूस म्हणून जन्माला येण आणि मरताना देव म्हणून जाण्याची अनुभूती सर्वश्रेष्ठ व्यक्ती घडवते. धर्म, वारकरी परंपरा, चाणक्य नीति या माध्यमातून त्यांनी प्रत्येकाच्या मनाचा ठाव घेतला. मानवी जीवनात असणाऱ्या चार आश्रमाबद्दल बोलत असताना त्यानी कश्या पद्धतीने काम केले पाहिजे याबद्दल देखील सुंदर वर्णन सांगितले. प्रत्येकाच्या मनाला स्पर्श करणार व्याख्यान त्यानी यावेळी केलं.

सी.ए.शशील गांधी यांनी ऑनलाईनचे मृगजळ या विषयावर अभ्यासपूर्ण विचार मांडले. ऑनलाइनची सुरुवात कशी झाली यापासून ते ऑनलाइन व्यवहाराचे तोटे उपस्थितांना समजाऊन सांगितले. शेअर मार्केट कशा पध्दतीने काम करते. त्याचे फायदे कशा पद्धतीने होऊ शकतात यावर मार्गदर्शन त्यांनी केले. मावळते अध्यक्ष प्रा.मनीष शहा यांनी २०२३-२४ या वर्षात संस्थेने केलेल्या कार्याचा आढावा वाचून दाखवला.

कु. अनोखी आशितोष दोशी, म्हसवड हिच्या वाढदिवसानिमित्त पालवी संस्थेस ११०००/- रुपयांची रोख मदत संस्थेच्या मंगलताई शहा यांच्याकडे सुपूर्त करण्यात आली.मिहीरभाई गांधी यांनी यावेळी नवनियुक्त संचालक मंडळास शपथ दिली. सातही जिल्ह्यामधून ४६ नूतन संचालकांनी शपथ घेतली. अरिहंत, देव, गुरु, शास्त्र यांच्या साक्षीने शपथ देण्यात आली. संस्थेचे कार्य मनापासून करुन तन-मन-धनाने सर्व कार्यात सहभागी होऊन जिनधर्माची प्रभावना करण्याची शपथ दिली. माजी संचालकांचा सत्कार मान्यवरांच्या हस्ते मानपत्र देऊन करण्यात आला.या कार्यक्रमास डॉ. सतीश दोशी, अनिल जमगे, किरण शहा, दीपक व्होरा, राजकुमार गांधी, डॉ.श्रेणिक शहा, हुकूमचंद दोशी, अजित माणिकशेटे आदी मान्यवर उपस्थित होते.या कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी पंढरपूर येथील कार्यकर्ते रोहित चंकेश्र्वरा, अगध गांधी व सहकारी यांनी कार्य केले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन प्रथमेश कासार यांनी केले.

## धरणे, आंदोलन, मोर्चा, निदर्शने, उपोषण करण्यावर निवडणूक कालावधीत निर्बंध

सोलापूर/प्रतिनिधीः लोकसभा सार्वत्रिक निवडणूक २०२४ चा कार्यक्रम १६ मार्च २०२४ रोजी घोषित झाला असुन, आदर्श आचारसंहिता अंमलात आली आहे.

या अनुषंगाने जिल्ह्यात धरणे, आंदोलन, मोर्चा, निदर्शने, उपोषण करण्यावर जिल्हाधिकारी तथा जिल्हादंडाधिकारी कुमार आशीर्वाद यांनी फौजदारी प्रक्रिया संहिता १९७३ चे कलम १४४ अंतर्गत निवडणूक कालावधी करीता निर्बंध आदेश जारी केले आहेत. जिल्ह्यातील लोकसभा सार्वत्रिक निवडणूकीची संपूर्ण प्रक्रिया शांततेत, निर्भय व न्याय वातावरणात पार पाडण्यासाठी जिल्हादंडाधिकार, उपविभागीय दंडाधिकारी, तालुका दंडाधिकारी कार्यालय तसेच जिल्ह्यातील सर्व शासकीय, निमशासकीय कार्यालय, शासकीय विश्रामगृह, सार्वजनिक ठिकाणे, रस्त्यावर कोणत्याही राजकीय पक्षाने, व्यक्तीने, संघटनेने निवडणूक लढविणाऱ्या उमेदवाराने किंवा त्याच्या प्रतिनिधीने अथवा त्याच्या हितचिंतकाने धरणे आंदोलन, मोर्चा, निदर्शने, उपोषण करण्यावर निवडणूक कालावधीकरीता (दि.६ जून २०२४) निर्बंध घालण्यात आले आहेत.

## सोलापूर ग्रामिण भागात कलम १४४ लागू; शस्त्र बाळगण्यास बंदी

सोलापूर/प्रतिनिधीः लोकसभा सार्वत्रिक निवडणूक २०२४ चा कार्यक्रम १६ मार्च २०२४ रोजी घोषित झाला आहे. सार्वत्रिक लोकसभा निवडणुकीच्या काळात तणावाचे वातावरण निर्माण होण्याची शक्यता असल्याने तसेच शस्त्र परवानाधारकाकडून त्यांच्याकडील शस्त्राचा गैरवापर होण्याचीही शक्यता आहे. त्यामुळे जिल्ह्यात (पोलीस आयुक्तालय हद्द वगळून )१६ मार्च ते ६ जून या कालावधीत परवानाधारकांना त्यांच्याकडील शस्त्र जवळ बाळगून फिरण्यास बंदी घालण्यात आल्याचे आदेश जिल्हाधिकारी कुमार आर्शीवाद यांनी जारी केले आहेत.

निवडणूक कालावधीत विशेषत: मतदानाच्या व मतमोजणीच्या दिवशी सार्वजनिक शांतता व सुव्यवस्थेचा धोका होण्याची शक्यता नाकारता येत नाही. लोकसभा निवडणूक प्रक्रिया सुरळीत व शांततेत निर्भय वातावरणात पार पडण्यासाठी आणि कायदा व सुव्यवस्था अबाधित राखण्यासाठी निवडणुकीच्या काळात परवान्यांवरील शस्त्र जवळ बाळगून फिरण्यास बंदी आहे.

फौजदारी प्रक्रिया संहिता १९७३ चे कलम १४४ अन्वये जिल्हाधिकारी तथा जिल्हा दंडाधिकारी कुमार आशीर्वाद यांना प्रदान करण्यात आलेल्या अधिकाराचा वापर करुन दि. १६ मार्च २०२४ रोजीच्या मध्यरात्रीपासून ते दि.६ जून २०२४ रोजीच्या मध्यरात्रीपर्यंत सोलापूर जिल्हयात (पोलीस आयुक्तालय हद्द वगळून) सर्व शत्र परवाना धारकांना त्यांचे परवान्यावरील शस्त्र जवळ बाळगुन फिरण्यास बंदी घालण्यात आल्याचे आदेशा नमुद करण्यात आले आहे.

## ध्वनीक्षेपकाच्या वापरावर निर्बंध

### सकाळी ६.०० वाजण्यापूर्वी आणि रात्री १०.०० वाजेनंतर ध्वनीक्षेपकाच्या निर्बंध

सोलापूर/प्रतिनिधीः लोकसभा सार्वत्रिक निवडणूक २०२४ चा कार्यक्रम १६ मार्च २०२४ रोजी घोषित झाला असुन, आदर्श आचारसंहिता अंमलात आली आहे. सदर निवडणूकीच्या प्रचार मोहीमेच्या कालावधीत सर्व राजकीय पक्षाचे उमेदवार तसेच निवडणूक लढविणारे उमेदवार आणि त्यांचे कार्यकर्ते आणि हितचिंतक हे वाहनांवर ध्वनीक्षेपक बसवून मोठ्या आवाजातून प्रचार केल्यास ध्वनी प्रदुषण होणे, सर्वसामान्य लोकांच्या जीवनातील शांततेस व स्वास्थ्यास बाधा पोहोचण्याची व उशीरा रात्री पर्यंत ध्वनीक्षेपण यंत्रणा चालु ठेवण्याची शक्यता असल्याने मुंबई पोलीस अधिनियम १९५१ चे कलम ३३ (एन) अन्वये जिल्हाधिकारी कुमार आशीर्वाद यांनी निर्बंध आदेश जारी केले आहेत.

ध्वनीक्षेपकाचा वापर पोलीस अधिकारी यांचे परवानगी शिवाय करता येणार नाही., सकाळी ६.०० वाजण्यापूर्वी आणि रात्री १०.०० वाजेनंतर कोणत्याही फिरत्या वाहनावर व कोणत्याही क्षेत्रात ध्वनीक्षेपकाचा वापर करता येणार नाही.दिवसा प्रचाराकरिता फिरणाऱ्या वाहनांनी ध्वनीक्षेपकाचा वापर विशिष्ट ठिकाणी थांबूनच करावा, ध्वनीक्षेपकाच्या आवाजासह फिरणाऱ्या वाहनास प्रतिबंध असेल. सर्व राजकीय पक्ष आणि उमेदवार आणि इतर व्यक्तीनी निश्र्चीत ठिकाणी ध्वनीक्षेपकाच्या वापरा संबंधीत घेतलेल्या परवानगीची माहीती जिल्हादंडाधिकारी, संबंधित निवडणूक निर्णय अधिकारी व संबंधीत यंत्रणेस कळविणे बंधनकारक राहील.असेही अदेशात नमुद करण्यात आले आहे.

# अब की बार चारसौ पार करण्याऐवजी अब की तडीपार करा; निरंजन टकले

मंगळवेढा : देशातील सुदृढ नागरिकांसाठी ज्या कॉंग्रेस सरकारने मोफत लसी दिल्या,मात्र या सरकारने कोरोनाच्या लसी विकत टोचल्या.तरीही आम्ही थॅंक्कू मोदीजी का म्हणायचे,त्यासाठी अब की बार चारसौ पार करण्याऐवजी अब कि बार तडीपार करण्याचे आवाहन पत्रकार निरंजन टकले यांनी केले.

कॉंग्रेसच्या वतीने आयोजित करण्यात आलेल्या लोकशाही की हुकूमशाही या विषयावर संकल्प सभेत ते बोलत होते.यावेळी व्यासपीठावर माजी मंत्री सुशीलकुमार शिंदे,सिध्दाराम म्हेत्रे, कार्याध्यक्ष ॲड नंदकुमार पवार,धनश्री परिवाराचे शिवाजीराव काळुंगे,विठ्ठल कारखान्याचे अध्यक्ष अभिजीत पाटील,चेतन नरोटे,प्रकाश पाटील,




मनोज यलगुलवार,मुझमील काझी,पांडुरंग चौगुले,तालुकाध्यक्ष चंद्रशेखर कौडूभैरी,राजाभाऊ चेळेकर,विनोद भोसले,मनोज माळी,ॲड रविकिरण कोळेकर,पांडुरंग जावळे,अजय अदाटे आदीसह कॉंग्रेस,राष्ट्रवादी कॉंग्रेस,शिवसेनेचे पदाधिकारी उपस्थित होते.यावेळी बोलताना पत्रकार टकले म्हणाले की, जी व्यक्ती आई व पत्नीला गॅरटी देवू शकले तेच आपणाला गॅरटी देवू लागली. दहा वर्षात महिला अत्याचाराच्या अनेक घटना घडल्या त्या घटनेत यांच्याच पक्षाच्या पदाधिकाऱ्यांची नावे कशी येतात.

पैसे बुडविणाऱ्याला राम मंदीराच्या उद्घाटनाला बोलावले मात्र देशाच्या प्रथम नागरिकाला बोलावले नाही.आणि त्यांच्याकडून नारी शक्तीचा सन्मान शिकवला जात आहे,देशावर केलेल्या दोनसे लाख कोटी कर्जाचा हिशोब आदी मागण्याचे आवाहन उपस्थितांना केले.

प्रत्येक बुथवर आघाडी घेण्याचे सांगत हे शक्य केल्यास इंडीया आघाडीचे सरकार येईल.माजी मंत्री सुशिलकुमार शिंदे म्हणाले की,मी इथला लोकप्रतिनिधी असताना विदर्भ अनुशेष ची अट रद्द करून मंगळवेढा उपसा योजना मंजूर केले.

दोन वेळा चुक झाली आता तिसरी चूक करू नका.विठ्ठलचे अध्यक्ष अभिजित पाटील म्हणाले की,सध्या हुकूम शहाच्या विरोधात देश एकत्र येत आहेत. सर्व आघाडी नेते महाराष्ट्र पिंजून काढत आहेत.मंगळवेढा उपसा सिंचन योजनेची न सापडणारी फाईल स्व.भारत,भालके च्या प्रयत्नाने सापडली.

राष्ट्रवादीचे अध्यक्ष शरद पवार व अजितदादाच्या प्रयत्नाने यापुर्वीच मंजूर केली.पाणी कुणाच्याही दंडाने येवू पण पाणी येवू द्या.प्रस्ताविकात तालुकाध्यक्ष प्रशांत साळे म्हणाले की तालुक्यातील रखडलेल्या प्रश्र्नाला फक्त कॉंग्रेस न्याय देऊ शकते.प्रणिती शिंदे यांनी विधानसभेत प्रश्र्न उपस्थित केल्यापासून मंगळवेढा उपसा सिंचन योजनेला गती आली ग्रामीण भागाभागातील दौऱ्याला चांगला प्रतिसाद मिळाला. लोकांच्या अनेक समस्था जाणून घेतल्यामुळे रखडलेल्या प्रश्र्नाला न्याय देऊ शकेल अशी भावना निर्माण झाली. सुत्रसंचालन भारत मुढे यांनी केले.

## समाजकल्याण अधिकारी सुनील खमितकर निलंबित

सोलापूर/प्रतिनिधीः जिल्हा परिषदेचे समाजकल्याण अधिकारी सुनील खमितकर यांच्यावर निलंबनाची कारवाई करण्यात आली आहे. समाज कल्याण आयुक्त ओम प्रकाश बकोरिया यांनी ही कारवाई केली आहे. मंगळवारी सायंकाळी या कारवाईच्या आदेशाची प्रत



जिल्हा परिषदेला प्राप्त झाली आहे. खमितकर हे समाजकल्याण अधिकारी या पदावर लातूर येथे कार्यरत असताना प्रशासकीय कामकाजातील विविध त्रुटी, वारंवार चुकीचे काम करण्याच्या कारणाने तसेच अधिकाऱ्यांसमोर अशोभनीय वर्तन केल्यामुळे त्यांची सेवा समाप्त करण्याबाबतचा प्रस्ताव लातूर जिल्हा परिषदेच्या मुख्य कार्यकारी अधिकाऱ्यांनी पाठविला होता. खमितकर हे वरिष्ठांच्या आदेशाचे पालन करत नाहीत, आढावा बैठकीस वारंवार विनापरवानगी अनुपस्थित राहतात सदस्यांच्या प्रश्नाचे गांभीर्य लक्षात घेत नाहीत, त्याचबरोबर त्यांचे काम असमाधानकारक आहे. असा ठपका या प्रस्तावात ठेवण्यात आला होता.

याशिवाय विविध सामाजिक संघटना व लोकप्रतिनिधी यांच्याकडून तक्रारी प्राप्त झाल्या असल्याचे निलंबन आदेशात नमूद करण्यात आले आहे. सोलापूर जिल्हा परिषद येथील कामकाजाबाबत त्यांच्याविषयी तक्रारी प्राप्त झाल्या होत्या. त्यानुसार चौकशी समितीद्वारे चौकशी करण्यात आली होती. या चौकशी समितीकडून समाजकल्याण विभागाचे सर्व दप्तर तपासणी करून अहवाल सादर करण्यात आला. यात खमितकर यांनी कार्यालयीन कामकाज करत असताना गैरशिस्तीचे वर्तन करणे, प्राप्त अनुदान वेळेत खर्च न करणे तसेच योजना राबविण्याकरिता योग्य उपायोजना न करणे, कर्मचाऱ्यांच्या सेवाविषयक बाबी पूर्ण न करणे असे आढळून आले होते. लातूर आणि सोलापूर येथील कामकाज वादाच्या भोवऱ्यात अडकल्याने गैर शिस्तीच्या वर्तनाचा ठपका खमितकर यांच्यावर ठेवण्यात आला आहे. त्यांचे निलंबन करून त्यांच्याविरुध्द विभागीय चौकशी प्रस्तावित करण्याबाबत शिफारस करण्यात आली आहे.

## सोलापूरच्या औज बंधाऱ्याने गाठला तळ; उजनीचे पाणी बंधाऱ्यात पोचणार

सोलापूर : शहराला पाणीपुरवठा करणाऱ्या औज बंधाऱ्याने तळ गाठला असून अवघे दोन-तीन दिवस पुरेल इतकेच पाणी सध्या त्यात शिल्लक आहे. दुसरीकडे उजनीतून भीमा नदीद्वारे सोडलेले



पाणी सोमवारी माचणूरच्या पुढे आले होते. बुधवारी (ता. २०) उजनीचे पाणी औज बंधाऱ्यात पोचेल. पण, गढूळ पाण्यामुळे शहराचा पाणीपुरवठा विस्कळीत होवू शकतो.

सोलापूर शहराला सध्या औज बंधारा व उजनी धरणावरील सोलापूर- उजनी पाईपलाइनमधून पाणीपुरवठा होतो. सध्या शहराला चार दिवसाआड पाणीपुरवठा होत आहे. केगाव, बाळे, देगाव, अवंती नगर, आदित्य नगर, जुळे सोलापूर, नई जिंदगी, श्री सिद्धेश्र्वर साखर कारखाना परिसर, किनारा हॉटेल परिसर, गावठाणमधील विकास नगर, सोनी नगर, सात रस्ता परिसर, गुरुनानक चौक परिसर, आंबेडकर नगर, शिक्षक सोसायटी, बापूजी नगर, अशोक चौक, कर्णिक नगर, पद्मनगर, कुचन नगर, अक्कलकोट रोड एमआयडीसी परिसर, विडी घरकूल, शेळगी ते दहिटणे परिसर अशा विविध भागाला टप्प्याटप्याने चार दिवसाआड पाणीपुरवठा केला जात आहे. उजनी- सोलापूर पाईपलाइन दुरुस्तीमुळे काही भागातील तर औज बंधारा कोरडा पडल्यावर किंवा पाईपलाइन नादुरुस्त झाल्यावर काही भागाचा पाणीपुरवठा विस्कळीत होतो.

सध्या उजनी धरण तळ गाठत असल्याने पाणी काहीसे गढूळ येत असल्याचे यापूर्वी पहायला मिळाले. आता नदीतून औज बंधाऱ्यात आलेले पाणी देखील गढूळ असल्यास औज बंधाऱ्यावरून होणारा पाणीपुरवठा देखील गढूळ असू शकतो, असे पाणीपुरवठा विभागाच्या अधिकाऱ्यांनी ‘सकाळ’शी बोलताना सांगितले. नागरिकांनी पाणी उकळून प्यावे, असे आवाहन महापालिकेकडून यापूर्वीच करण्यात आले आहे. दरम्यान, उजनीचे पाणी औज बंधाऱ्यात पोचल्यावर पुढील ४५ ते ५० दिवस शहराच्या पाण्याचा प्रश्र्न दूर होणार आहे. पण, मे महिन्यात पुन्हा एकदा सोलापूरसाठी भीमा नदीतून पाणी सोडावे लागणार असून तीव्र उन्हाळ्यामुळे त्यावेळी अंदाजे सात टीएमसी पाणी लागू शकते.

यंदाच्या पावसाळ्यात ६० टक्के भरलेले उजनी धरण सध्या उणे २८ टक्क्यांपर्यंत आले असून धरणात सध्या मृतसाठ्यातील ४९ टीएमसी पाणी शिल्लक आहे. पण, त्यात जवळपास १८ ते १९ टीएमसी गाळ असून राष्ट्रीय हरित लवादाच्या निर्बंधानुसार पूर्ण पाणी उपसा करता येत नाही. दुसरीकडे उजनी धरणावर अनेक गावांसह शहरांचा व एमआयडीसींचा पाणीपुरवठा अवलंबून आहे.

## महाराष्ट्र शासनाचे १०, १३, १४ व १५ वर्षे मुदतीचे प्रत्येकी ३ हजार कोटी रुपयांचे रोखे विक्रीस

मुंबई : महाराष्ट्र शासनाच्या १० वर्षे मुदतीच्या ३ हजार कोटी रुपयांच्या रोख्यांची विक्री २१ मार्च २०२४ रोजी अटी आणि शर्तींच्या अधीन राहून लिलावाने करण्यात येईल. या कर्जाद्वारे मिळालेल्या रकमेचा विनियोग शासनाच्या विकास कार्यक्रमासाठी केला जाईल, अशी माहिती वित्त विभागाच्या सचिव शैला ए. यांनी पत्रकान्वये दिली आहे.

अस्पर्धात्मक लिलाव पद्धतीनुसार (सुधारित) कर्जरोखे रकमेच्या १० टक्के रक्कम पात्र वैयक्तिक व संस्थात्मक गुंतवणुकदारांना वाटप करण्यात येईल. मात्र, एका गुंतवणूकदारास एकूण अधिसूचित रकमेच्या जास्तीत जास्त एक टक्का रकमेच्या मर्यादेपर्यंतच वाटप करण्यात येईल. २१ मार्च २०२४ रोजी भारतीय रिझर्व्ह बँकेतर्फे मुंबई येथील कार्यालयात लिलाव केला जाईल, तर लिलावाचे बीडस् संगणकीय प्रणालीनुसार, रिझर्व्ह बँक ऑफ इंडिया, कोअर बँकिंग सोल्यूशन, (ई-कुबेर) सिस्टीमनुसार सादर करावयाचे आहेत.यामध्ये स्पर्धात्मक बिड्स संगणकीय प्रणालीद्वारे ई-कुबेर सिस्टीमनुसार सकाळी १०.३० ते ११.३० वाजेपर्यंत सादर करावेत. तर अस्पर्धात्मक बीडस् ई-कुबेर सिस्टिमनुसार सकाळी १०.३० ते ११.०० पर्यंत सादर करावेत. लिलावाचा निकाल भारतीय रिझर्व्ह बँकेच्या संकेतस्थळावर त्याच दिवशी प्रसिद्ध करण्यात येईल. यशस्वी झालेल्या बीडर्सकडून रकमेचे प्रदान २२ मार्च २०२४ रोजी रोखीने, बँकर्स धनादेश/प्रदान आदेश, डिमांड ड्राफ्ट किंवा त्यांच्या रिझर्व्ह बँक ऑफ इंडिया, मुंबई येथील खात्यात देय असलेले धनादेश बँकेची कामकाजाची वेळ संपण्यापूर्वी अधिदानाने प्रदान करण्यात येतील. कर्जरोख्याचा कालावधी १० वर्षांचा असून, रोख्यांचा कालावधी २२ मार्च, २०२४ पासून सुरू होईल, तर कर्जरोख्याची परतफेड दिनांक २२ मार्च २०३४ रोजी पूर्ण किमतीने केली जाईल. व्याजाचा दर लिलावात विक्री केलेल्या रोख्यांवरील दरसाल दरशेकडा कूपन दराएवढा असेल. व्याजाचे प्रदान प्रतिवर्षी २२ सप्टेंबर आणि २२ मार्च रोजी सहामाही पद्धतीने करण्यात येईल.शासकीय रोख्यांमधील बँकांची गुंतवणूक ही बँकिंग विनियम अधिनियम अंतर्गत सांविधिक रोकड सुलभता गुणोत्तर (डङठ) या प्रयोजनार्थ पात्र समजण्यात येईल. हे कर्जरोखे पुन: विक्री-खरेदीसाठी अनुज्ञेय असतील, अशी माहिती वित्त विभागाने दिली आहे.

## ब्रेस्ट प्रांत आणि महाराष्ट्र यांच्यात सहकार्य करार करण्यास बेलारुस उत्सुक : अलियाक्सांद्र मात्सुकोऊ

मुंबई : बेलारूस भारतासोबत व्यापार, व्यवसाय, पर्यटन आणि सांस्कृतिक संबंध वाढवण्यास उत्सुक आहे. या दृष्टीने बेलारुसमधील ब्रेस्ट प्रांत महाराष्ट्राशी ‘भगिनी राज्य’ सहकार्य करार करण्यास प्रयत्नशील असल्याची माहिती मुंबईतील बेलारुसचे नवनियुक्त वाणिज्यदूत अलियाक्सांद्र मात्सुकोऊ यांनी आज येथे दिली.

बेलारुसने मुंबई येथे प्रथमच आपला स्वतंत्र वाणिज्य दूतावास सुरु केला असून पहिले वाणिज्यदूत अलियाक्सांद्र मात्सुकोऊ यांनी मंगळवारी (दि. १९) राज्यपाल रमेश बैस यांची राजभवन मुंबई येथे सदिच्छा भेट घेतली, त्यावेळी ते बोलत होते.



मात्सुकोऊ यांनी राज्यपालांना सांगितले की नुकतीच बेलारुसच्या परराष्ट्रमंत्र्यांनी नवी दिल्ली येथे परराष्ट्र व्यवहार मंत्री एस. जयशंकर यांची भेट घेतली. यावेळी ब्रेस्ट प्रांत - महाराष्ट्र प्रादेशिक सहकार्याच्या चौकटीवर चर्चा झाली.

यावेळी वाणिज्य दूतांनी राज्यपालांना सांगितले की, बेलारुसचे राष्ट्राध्यक्ष अलेक्झांडर लुकाशेन्को हे भारतासोबत घनिष्ट संबंध विकसित करण्याबाबत आग्रही असून त्यांचा भारत दौऱ्यावर येण्याचा मानस आहे. त्यादरम्यान ते महाराष्ट्रालाही भेट देतील.

बेलारुस सोविएत युनियनचा भाग असताना आपल्या देशाचे भारतासोबत संबंध अतिशय घनिष्ट होते. हे संबंध आता पुनश्र्च प्रस्थापित करण्यासाठी बेलारुस उत्सुक असल्याचे त्यांनी राज्यपालांना सांगितले.रशियाचा शेजारी असलेला बेलारुस हा देश भारतासाठी युरोपियन युनियन आणि रशियन फेडरेशन यांच्यातील पूल म्हणून काम करू शकतो, असे सांगून बेलारुस मुंबईला वाहतूक व्यवस्थापनात मदत करु शकतो, असे ते म्हणाले.

महाराष्ट्राशी मानवतावादी संबंध दृढ करण्याच्या दृष्टीने बेलारूस सरकार पुण्याजवळील एका अनाथाश्रमातील ३० मुलांना सहलीसाठी बेलारुसला नेणार असल्याचे त्यांनी सांगितले.

बेलारुसमध्ये भारतीय संस्कृती, विशेषत: भारतीय संगीत, नृत्य, योग आणि चित्रपट खूप लोकप्रिय असल्याचे सांगून आपला देश लवकरच नवी दिल्ली तसेच मुंबई येथे सांस्कृतिक दिन सोहळ्याचे आयोजन करणार असल्याची माहिती त्यांनी दिली.

बेलारुसच्या महावाणिज्य दूतांचे महाराष्ट्रात स्वागत करताना राज्यपाल श्री. बैस यांनी महाराष्ट्र आणि बेलारुसमधील विद्यापीठांमध्ये शैक्षणिक सहकार्य, विद्यार्थी-आदान प्रदान, प्राध्यापक आदान प्रदान तसेच सांस्कृतिक देवाणघेवाण वाढावे, अशी अपेक्षा व्यक्त केली.

नवी दिल्ली आणि राजधानी मिन्स्क दरम्यान थेट विमानसेवा सुरू झाल्याने यानंतर उभयपक्षी पर्यटनाला चालना मिळेल, अशी आशा त्यांनी व्यक्त केली.

## माढा, सातारा किंवा पुणे लोकसभा मतदारसंघातून निवडणूक लढवावी, राज्यातील कार्यकर्त्यांचा शरद पवारांना आग्रह

पुणे : देशात लोकसभा निवडणुक जाहीर झाली असून त्या पार्श्र्वभूमीवर प्रत्येक राजकीय पक्षाकडून जोरदार तयारी सुरू झाली आहे. या निवडणुकीत महायुतीकडून राज्यात उमेदवार जाहीर करण्यात आले आहेत. पण महाविकास आघाडीकडून



अद्यापही जागा वाटपाबाबत केवळ चर्चा आणि बैठका सुरू आहेत. त्या सर्व घडामोडींदरम्यान पुण्यातील शिवाजीनगर येथील निवासस्थानी राष्ट्रवादी कॉंग्रेस पक्षाचे अध्यक्ष शरद पवार यांना राज्यातील अनेक भागातील कार्यकर्ते भेटण्यास येत आहे.त्यानंतर पत्रकारांशी अनौपचारिक गप्पा मारताना शरद पवार म्हणाले की, मी आजवर १४ निवडणुका लढवल्या आणि त्या निवडणुका जिंकल्या देखील आहेत. त्यानंतर मी चार वर्षांपूर्वीच जाहीर केले की, यापुढे निवडणुका लढवायच्या नाहीत. मात्र असे असताना देखील आपण याही वेळी माढा, सातारा किंवा पुण्यामधून लोकसभेची निवडणूक लढवावी यासाठी कार्यकर्ते आग्रही असल्याचं शरद पवार यांनी सांगितलं.